नीलम सांगवई



# बंकू बहाद्दर

## नीलम संगवई

## ई साहित्य प्रतिष्ठान

# बंकू बहाद्दर : Banku Bahaddar

## लेखिका : नीलम संगवई

नीलम गिरीश संगवई,
तारा -३०५ ध्रुव तारा को. ऑप. हौ. सो.
अशोकवन, युनिवर्सल हायस्कूलजवळ
दहिसर (पूर्व)मुंबई ४०० ०६८
ई-मेल neelam_sangwai@yahoo.co.in
मो.नं.9004689615

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा व्हिडिओ, ऑडिओ, नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2014

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

मुलांबरोबर वाढणाऱ्या सर्व मोठ्यांना हे पुस्तक अर्पण

नीलम संगवई

# बंकू बहाद्दर ... एक वेगळं बालविश्व

बंकू बहाद्दर हे पुस्तक प्रकाशित करताना एक वेगळाच आनंद होत आहे. त्यात तुम्हाला सामिल करून घ्यावं म्हणून हे दोन शब्द.

मराठीत बालसाहित्य खूप नसलं तरी अगदी कमीही नाही. साने गुरुजींपासून ते आताच्या राजीव तांबें, पृथ्वीराज तौर पर्यंत अनेक दिग्गज साहित्यिकांनी मराठीच्या बालविश्वात सुंदर भर घातली. अनेक बाल नियतकालिकंही मराठीत चालतात. चांदोबापासून ते लता गुठे यांच्या पर्यंत अनेक मासिकं मराठी बालसाहित्याला श्रीमंत करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े चालणारे अनघा हिरे संपादित बालनेटाक्षरी हे ऑनलाईन नियतकालिकही आहेच. ई साहित्य प्रतिष्ठानने या वर्षी साहित्य संमेलनात साठ ई पुस्तकांची एक सिडी खास मुलांसाठी काढली आणि ती साहित्य संमेलनाच्या पहिल्या दिवशी – शुक्रवारची कमी गर्दी असूनही- संपली आणि शनिवार रवीवार

वाचकांच्या प्रश्नांना उत्तर देता देता नाकी नऊ आले. तेव्हा मराठीत बालसाहित्याला मागणीही भरपूर आहे.

मात्र मराठी बालसाहित्याचा एक परीघ आहे. तो आहे मध्यमवर्गीय. तो मात्र अजूनही तुटलेला नाही. म्हणूनच आज बंकू बहाद्दर या नव्या बाल नायकाचं स्वागत करायला आम्हाला आनंद होत आहे. झोपडपट्टित जन्म झालेला आणि एका श्रमिक जोडप्याच्या संस्कारांत वाढलेल्या या बंकूचं आम्हाला खास कौतुक आहे. त्याच्या वागण्या बोलण्यात एक वेगळा, मध्यमवर्गीय मुलांत न दिसणारा आत्मविश्वास आहे. एक खाज आहे. आणि ती खाज त्याला बरीच लांबवर नेणार आहे. बदलत्या काळाच्या नव्या संदर्भांत हा बंकू आजवरच्या बालनायकांहून वेगळा उठून दिसतो.

हे पुस्तक म्हणजे नुसती सुरुवात आहे. यात बंकूची फ़क्त चुणूक दाखवणाऱ्या तीन कथा आहेत. पण नीलम संगवई यांनी एक थ्री डायमेन्शनल जीवंत व्यक्तीमत्त्वाचा बंकू यातून उभा केला

आहे. तेज तर्रार डोळे, मोठे कान, उभे केस, शार्प हालचाली आणि धारदार तर्कसंगत विचार असलेला हा बंकू मराठी बालसाहित्यात स्वतःची एक खास जागा करून दाखवील यात शंकाच नाही. नव्या आत्मविश्वासाने ही पिढी येणाऱ्या काळात बरेच पराक्रम गाजवील आणि बंकू हा त्यांचा आदर्श हिरो असेल.

ये तो सिर्फ़ अंगडाई है

आगे बडी लडाई है.

Red carpet to Neelam and Banku.

सुनिल सामंत

टीम ई साहित्य



# बंकू बहादूर

# चोर चोर

बंकूला आता प्रवास करायला आवडायला लागल होतं. खूप खूप लोकांमध्ये राहणे, मोठ्ठ्या माणसांमधून लवचिकपणे अंग वाकून चढाओढीने बस मध्ये चढणे, मोक्याची जागा पकडणे हे सगळे त्याला पहिल्यांदा किळसवाणे, नंतर उत्सुकतेचं आणि आता गमतीदार वाटायला लागले होते. बंकूची चाळ म्हणजेच झोपडपट्टी एस. आर. ए. म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणने पुनर्विकासासाठी ताब्यात घेतली होती. व त्यावर काम सुरु होते. चाळी पडून तिथे उंच आणि पक्की इमारत बांधण्यात येणार होती. त्या बिल्डींगमधली एक पक्की रूम त्यांना मिळणार होती. बांधकाम होईपर्यंत त्यांच्या राहण्याची सोय ५ कि. मी. दूर अंतरावर (४ बस स्टॉप पुढे) करण्यात आली होती.

बंकूची शाळा त्याच पूर्वीच्या जागेत होती. सगळा चांगला जम बसला  एवढ्या दुरून बंकूला शाळेत याव लागायचं. पहिले दोन दिवस बाबांनी सोडलं. त्यानंतर त्यांना नव्या जागेजवळ दुसर काम मिळालं, ते रात्रपाळीचं. सकाळी बाबा कामावरून परत येईपर्यंत बंकुच्या शाळेला उशीर होऊ लागला.

त्यामुळे बंकुने एकट्याने शाळेत जावं असं ठरलं. शाळेसाठी दोघांच्या तिकिटाचे, येण्या-जाण्याचे पैसे परवडत नव्हते. काही दिवसानंतर आईलाही तात्पुरत्या ट्रांझिट जागेजवळ काम मिळालं. बाबाच्या रात्रीच्या कामामुळे आणि नव्या जागेत राहायला गेल्यामुळे आधीची संगत सुटली,  दारू पिण कमी झालं. त्यामुळे आईपण खुश होती. बंकू हुशार होता, तंदुरुस्त होता. एकट्याने प्रवास करू शकत होता. जाण्याचे १०, येण्याचे १० असे २० रू. रोजचा खर्च होता.

त्याच्या सोबतच्या इतर मुलांनी त्या वर्षी शाळा न शिकण्याचे आणि पुढच्या वर्षी नव्या घरात राहायला गेल्यानंतरच शाळेत जायचे ठरवले होते. त्यांच्याच चाळीतला किशोर आईसोबत टिकल्या-बिंद्याच्या कारखान्यात कामालाही जाऊ लागला होता. कोणी

कोणी रोज शाळेत न जाता फक्त परीक्षेसाठीच जायचे ठरवीत होते. कारण-प्रवास खर्च, रोजचे २० रू कशाला खर्चायचे? बंकुने मात्र रोज शाळेत जाण्याचा घोषा लावल्याने त्याला शाळेत पाठविणे आईबाबांना भाग पडले. तेवढ्या पैशात मीठ-मसाला, अंडी, भाजी, केळी बरंच काय काय मिळतं की!! अशा सगळया परिस्थितीत इयत्ता तिसरीत शिकणारा, 8 वर्षांचा आपला बंकू मोठ्या शहरातल्या मोठ्या सिटीबसमधून गर्दीतून शाळेत जाऊ लागला. बंकूला आता नेहमीच्या वेळी त्या त्या बस मधून येणारे चेहरे ओळखीचे झाले होते. कंडक्टर-ड्रायव्हर, बसमधल्या नेहमीच्या “सीटा” पॅसेंजर आता त्याला माहित झाले होते. नवे लोक फार कमी असायचे.

एका दिवशी त्याच्या बस मध्ये एक रुबाबदार तरुण मुलगा चढला. त्याने केस सुंदर मागे वळवले होते. आणि त्याने मारलेला सुगंधी फवारा खूप छान होता. त्याने निळा शर्ट आणि त्यावर जांभळा रेशमी टाय लावला होता. त्याच्याकडे असलेला सिल्वर मोबाईल महागडा आणि सुंदर होता. तो तरुण मोबाईल कानाला न लावता, कानाला लावलेल्या मशीन मधून बोलत होता. बंकू नजर न हटवता मन लावून त्याच्या सगळया हालचाली न्याहाळत होता. एका नजरेतच बंकू त्या तरुणाचा फॅन झाला. त्या तरुणाने कंडक्टरला हात

दाखवला, कंडक्टरने सुद्धा ओळखल्याची खूण म्हणून हात दाखवला. त्यानंतर तो तरुण माशिनवरून इंग्रजी बोलण्यात गढून गेला. एवढे छान इंग्रजी बोलत होता तो, बंकुने ठरवूनच टाकले मनाशी, मोठेपणी त्यालापण असेच व्हायचे आहे. पुढे त्याचा स्टॉप आला आणि तो उतरूनही गेला. त्या तरुणाचे बिचार बंकुच्या मनात घर करून बसले. त्याला फारसे इंग्रजी येत नसले तरी, त्या तरुणासारखे खोटे खोटे  मोबाईलवर इंग्रजी त्याने बोलून पहिले व स्वतःशीच खूष झाला.

दुसऱ्या दिवशीही तो बसमध्ये आला. त्याने तसाच पिवळा शर्ट व लाल टाय लावलेला. बंकूला तर करमणूक झाली होती, त्याचे निरीक्षण करायचा आणि नंतर नक्कल. तीन दिवसानंतर बंकुच्या लक्षात आले की, तो तरुण पैसे देऊन तिकीट घेत नाही, पास ही दाखवत नाही. किंवा कार्डच्या मशीनवर कार्ड ठेवत नाही. मग काय करतो तो? तिकीट काढण्याची आणखी एखादी नवी पद्धत आहे कि काय?  विचार केल्यानंतर आणि आणखी दोन दिवस निरीक्षण केल्यानंतर त्याच्या लक्षात आले की, तो तरुण तिकीट काढत नाही- पैसे वाचवतो.

अशी गम्मत होती तर. वाचवलेला पैसा म्हणजे कमावलेला पैसा. आपणही तसेच करावे जाण्या येण्याचे एका दिवसाचे १० आणि १० असे वीस रुपये वाचतील..काय काय करता येईल त्या वीस रुपयांमध्ये... रंगीत पेन, चॉकलेट, चिप्स, कंपास बॉक्स, केळी, खोडरबर, पेन्सिल.. वडा पाव, भजी, उसळ पाव

पण त्याच्या विचारांची झेप जास्त लांब जाऊ शकली नाही कारण त्याच्या लक्षात आले, कि तसे करणे चुकीचे आहे. आणि त्या तरुणाचेही विनातिकीट प्रवास करणे चुकीचे होते. वाचलेला पैसा कमावलेल्या पैशांसारखा असतो, तर अशाप्रकारे नियम मोडून वाचवलेला पैसा चोरी केल्यासारखेच आहे की.

त्याच्या आवडत्या रोल मॉडेलने असे चुकीचे वागावे हे बंकूला नाही आवडले. पण तो लहान होता आणि अनोळखी होता. त्याला आपण कसे बोलणार ? दिवसभर बंकूला अस्वस्थ झाले. एवढा मस्त माणूस.. पण तिकीट नाही काढत..! त्यादिवशी त्याने इंग्रजी बोलण्याची प्रॅक्टिस नाही केली. कशातच मन लागत नव्हते. त्याला मोठा होऊन असे तर व्हायचे नव्हते. कंडक्टर काका सुद्धा त्याला का मागत नाहीत तिकीट ? त्यांच्या साहेबांचा

मुलगा असेल  का तो? काय कारण असेल? बंकुने त्याच्या परीने विचार करून  मनाशी काहीतरी ठरवले.

दुसऱ्या दिवशी जेव्हा तो तरुण बस मध्ये चढला, तेव्हाही बंकुने त्याच्याकडे पूर्ण वेळ नजर ठेवली, तो ज्या बस स्टॉपला उतरायचा, तो स्टॉप जवळ येऊ लागला तसा तो तरुण समोरच्या दरवाज्याच्या दिशेने सरकू लागला. त्याच्यासोबत बंकुही सरकू लागला. आणि थोड्याच वेळात बंकुने “चोर” “चोर” “पकडो” असे ओरडायला सुरुवात केली. आजूबाजूचे लोक अचानक सावध झाले. त्यांनी कुठे आहे चोर? कोण चोर? असे विचारायला सुरुवात केले. गोंधळून गेले लोक. बंकूला कुठेय चोर असे विचारताच त्याने त्या टाय घातलेल्या तरुणाकडे बोट दाखवले. तो तरुण चवताळून त्याच्या अंगावर धावून आला. “चोर दिसतो काय बे मी तुला?”

“दिसत नाही पण आहेस तू चोर . तिकीट कुठे तुझ ?”बंकुने विचारले.

“ए दीड फुट .. तू कोण रे मला तिकीट विचारतो? आणि चोर चोर काय ओरडतो?” त्या तरुणाने बंकूची कॉलर धरून रागाने दाट ओठ खाऊन विचारले. आणि त्यापाठोपाठ एक

शिव्यांची माळ ओढली. त्याचे ते बिभत्स हावभाव, बोलणे, त्याच्या पेहरावालाच काय माणुसकीलाच शोभत नव्हते. एवढा छान इंग्रजी बोलणारा माणूस कित्ती घाणेरड्या शिव्या देतो आणि गचाळ वागतो, ते पाहून बंकूला किळस वाटली.

त्या माणसाचा बस स्टॉप आला होता, बस थांबली. कंडक्टर पुढे आला तेवढ्यात. त्याने विचारले, “काय प्रकार आहे?” बंकुने धीराने सांगितले “तो माणूस रोजच विनातिकीट प्रवास करतो. आणि तुम्हीसुद्धा दुर्लक्ष करता.” कंडक्टर काका म्हणाले, “असे होय, जाऊ दे हिरो, तू लक्ष देऊ नको त्याच्याकडे, असतात काही लोक तसे. जाऊ द्या गाडी लेट होईल..” असे म्हणून त्यांनी बेल मारली. तेवढ्यात बंकू जोरात ओरडला, “सरकारचे पैसे बुडवणे म्हणजे चोरीच आहे. चोर! चोर!”

दोन तीन माणसे पुढे झाली आणि त्यांनी डबल बेल मारून गाडी थांबवली. आणि तिकीट न काढण्याचे कारण त्या तरुणाला आणि कंडक्टरलाही विचारले. तक्रार करण्याची धमकी दिली. पब्लिकचा असा अवतार पाहून कंडक्टरही घाबरला. काही जणांनी करप्शन

विरुद्ध फोन करण्याचे सुचवले.  त्यावर कंडक्टरनेही माघार घेऊन दंडासहित तिकिटाच्या रक्कमेची पावती फाडली. त्या तरुणालाही पैसे भरावे लागले.

पुढे बंकुच्या शाळेचा स्टॉप आला, तो उतरताना कंडक्टरने डोळे वटारून “थांब बघून घेतो तुला उद्या ” असे धमकावले. तुम्हाला काय वाटत बंकू घाबरला असेल आणि खरच दुसऱ्या बसने गेला  असेल? नाही ना? शूर वीर आहे ना बंकू.

पण खरच दुसऱ्या दिवशी बंकुने जरा लवकर उठून लवकरची बस पकडली. घाबरल्यामुळे नाही काही. त्या ‘टाय फाय’ तरुणाची आणि कंडक्टरची काळ पब्लिकने चांगली हजेरी घेतल्यामुळे ती बस झक्कास चालणार याची बंकूला खात्री होती. बंकू चढला दुसऱ्या बस मध्ये- दुसरी धमाल करण्यासाठी.!!!

---***---

# बंकू झाला मोठा

नव्या इमारतीत रहायला आल्यानंतर आणि बाबांना सुपरवायझरची नोकरी मिळाली तेव्हापासून इतर मुलासारखा पासून बंकू आई बाबांबरोबर मॉल मध्ये जायला निघाला होता. पूर्वीच्या दुकानांच्या जागेवर मोठा मॉल बांधला होता आणि त्यांचा नेहमीचा येण्याजाण्याचा रस्ताही बदलला होता. बंकू आई बाबांबरोबर बाहेर जायला निघाला होता. आई बाबांसोबत बाहेर जायचे म्हणजे त्याला खूप म्हणजे खूप म्हणजे खूपच मज्जा यायची. आई बाहेर जाताना केस मोकळे सोडते, पँट घालून छान तयार होते. बाबा सुध्दा कपाटातला परफ्युम उडवतात आणि खूष असतात. आई बाबांसोबत बाहेर जायचे

म्हणजे मॉल मध्ये जायचे, सरकत्या जिन्यांवर चढ उतार करायची, झगमग करणारी दुकाने बघायची, खेळ खेळायचे आणि बाहेर हॉटेल मध्ये जेवायचे. एवढी मज्जा. मॉल मध्ये फिरताना आपण टी.व्ही.वर दाखवतात तसे परदेशातल्या एखाद्या शहरात फिरतोय की काय असे बंकूला वाटायचे.

त्या दिवशी असेच मॉलमध्ये जायचे म्हणून बंकू खूष होता. मॉलमध्ये प्रवेशद्वाराजवळ एका मोबाईल कंपनीची जाहिरात सुरु होती. मोबाईल कंपनीचा लोगो असणारा फुगा एका माणसाने बंकूच्या हातात दिला आणि बाबांच्या हातात एक ब्रोशर दिले. तो माणूस फटाफट मोबाईल कंपनीची माहिती सांगू लागला. बाबांनी त्या माणसाला सांगितले की बाबा सध्या जो मोबाईल वापरतात तो पण चांगला आहे आणि त्यात ते खूष आहेत. मग त्याने 'विश यू अ गुड डे सर, buddy' असे म्हणून बंकूकडे बघून डोळे मिचकावले. आणि 'बाय' म्हणून तो दुसऱ्या माणसांकडे वळला.

बंकू मात्र गॅस फुगा मिळाला म्हणून आनंदात होता. त्याने खाली खेचलं तरी फुगा हट्टी मुलासारखा वर वरच जायचा. त्याला खाली आणले तरी तो पुन्हा डुग डुग करीत वर जायचा. एकदा तर बंकूच्या हातातून सुटलाच. बाबांनी पटकन पकडला म्हणून बरे झाले. मग मात्र बंकूने तो हातात घट्ट धरून ठेवला. असे वाटत होते की फुगा पण खूप खूष आहे बंकूसारखाच. मग बंकूला पण फुग्यासारखे हलके हलके वाटायला लागले. जसे बंकूने फुग्याची दोरी हातात घट्ट पकडली होती तसाच मम्माने पण बंकूचा हात घट्ट पकडून ठेवला होतं, सुटून जावू नये म्हणून.

बंकूने त्याच्या मनगटावर फुग्याची दोरी घट्ट बांधून टाकली. आणि त्यांची फॅमिली निघाली. आई हसली, बाबाही हसले.

काचेच्या गोल गोल मोठया मोठया लिफ्ट मधून बंकूला तर आपणही फुगा होवून वर वर चाललो आहोत असे वाटत होते. अगदी हलकं हलकं, गुबगुबीत, रंगीत. वरच्या मजल्यावर लिफ्टचा दरवाजा उघडल्याबरोबर बंकूला एका मुलीच्या रडण्याचा कर्कश्श

आवाज आला. ती खूप जोरात रडत असावी. बंकूने आवाजाच्या दिशेने बघितले तर सुंदर नीळा फ्रॉक घातलेली, फुलांफुलांचा हेअर बेल्ट घातलेली प्ले ग्रुप मधली मुलगी रडत होती. मम्मा मम्मा असे म्हणून ती तिच्या आईच्या हाताला लोंबकळत होती.

आजूबाजूने येणारे जाणारे सगळे लोक, ‘चूप हो जाओ बेटी’ ‘क्या हुआ?’ ‘क्या चाहिये तुम्हे?’ असे वेगवेगळे प्रश्न विचारून निघून जात होती. तरीही ती मुलगी रडायची थांबत नव्हती. तिची मम्मी तिला शांत करण्याचा खूप प्रयत्न करीत होती पण ती मुलगी शांत होत नव्हती. शेवटी तिची मम्मा तिला रागवायला लागली. तिची मम्मा रागवायला लागली तशी त्या फ्रॉकवाल्या मुलीने जास्तच जोरात रडायला आणि ओरडायला सुरवात केली. मॉलमधील सगळे लोक त्यांच्याकडे बघू लागले.

आणि .. आणि.. यु नो..?

जिथे जिथे मेस

किंवा अवघड केस,

येस .. बंकू.. येस ... रेडी टू फेस

बंकू, बंकूची आई आणि बंकूचे बाबा त्या मुलीच्या जवळ जाताच त्या मुलीने बंकूच्या हाताला बांधलेल्या फुग्याकडे बघितले. ती एकदम शांत झाली आणि खुदकन हसली. बंकूकडे बोट दाखवून ती फुगा मागायला लागली. आपला आवडता खुशीचा फुगा तिला द्यावा का नाही हे बंकूला कळेनासे झाले. पण ती रडायची थांबून हसली, तिलाही तो फुगा आवडलाय आणि त्याच्याकडे ती कौतुकाने बघतेय, शिवाय ती आपल्यापेक्षा लहान आहे असा विचार करून त्याने आपल्या मनगटावर बांधलेला दोरा सोडला आणि तो फुगा त्या मुलीला देवून टाकला. फुगा देताना त्यालाही खूप आनंद झाला तो फुगा हातात घेवून त्या मुलीने एकदम उडीच मारली. तिची मम्मा पण खूष झाली कारण तिची प्रिन्सेस रडायची थांबली आणि हसायला लागली होती ना!

‘thanks थँक यू म्हण बेटा दादाला’ आईने तिला सांगितले. गोडसं हसून आणि लाजत लाजत बंकूकडे बघून ती म्हणाली ‘थँक यू thanks’

‘माय प्लेझर, you वेलकम welcome’ बंकूने पण लगेच गोल्डन वर्ड म्हणून टाकले. त्या मुलीला बाय करून बंकू, मम्मा आणि बाबा पुढच्या आउटलेट मध्ये गेले.

आईने विचारले, ‘ बंकू बेटा, तू तुझा फुगा त्या मुलीला कसा काय दिलास?’

बंकू म्हणाला ‘आई, ती छोटी आहे ना, ती रडत होती म्हणून दिला’

बाबा म्हणाले, ‘म्हणजे आता तू मोठा झालास तर’

बंकू म्हणाला, ‘छोट्यांना काही दिलं की मोठं झाल्यासारख वाटतं.’

बाबा हसले, मम्मा हसली मग बंकू पण हसला.

एवढ्यात बंकू जोराने पायऱ्या उतरून तो त्या मुलीकडे धावायला लागला. आई , बाबांना तर काही काळातच नव्हतं. हा असं का धावतोय? या गर्दीत त्याला कसे शोधणार? मोठेपणाचा आव आणून फुगा त्या मुलीला दिला खरा पण आता जावून तो परत मागतोय का काय? आईने तर जोरजोरात हाक सुध्दा मारल्या.

पण बंकू धावतच त्या मुलीजवळ गेला आणि म्हणाला ‘काकी, टेक केयर ऑफ द बलून , हं....’ आणि एवढ सांगून तो धावत धावत परत आई बाबांजवळ आला सुध्दा. आई बाबांनी हुश्श केलं आणि ‘अरे सांगून जायचं, सोबत राहायचं, एवढ्या गर्दीत कुठे शोधायचे तुला?’ असे म्हणायला सुरवात केली.

खूप म्हणजे खूप म्हणजे खूप्पच मज्जा करून आईबाबांसोबत बंकू घरी आला. आईने कपडे बदलून केस बांधले. बाबांनी पण घरातले कपडे ड्रेस घातले आणि ते हिशेब करू लागले. पण आपला  बहाद्दर बंकू? त्याला तर खूप काम होते. कपडे बदलायला सुध्दा वेळ नव्हता. त्याने कपाट उघडले. जीग्सा पझलचे सगळे तुकडे डब्यात भरले. त्या वस्तू एका

पेपर बॅग मध्ये ठेवल्या. सगळे मार्बल्स म्हणजे गोट्या एका डब्यात ठेवल्या. खेळणी नीट व्यवस्थित ठेवली. अगदी पारच कामातून गेलेली, मोडलेली खेळणी सुध्दा एका मोठ्या बॅग-पिशवीत भरून ती बॅग त्याने सर्वात खालच्या कप्प्यात ठेवली. लोंबणारी स्टिकर्स नीट चिकटवली.

गोष्टींची, अभ्यासाची पुस्तके Painting books नीट लावून ठेवले. पेन, पेन्सिल्स, ब्रश, कंपासपेटी, आय कार्ड सगळया वस्तू जागच्या जागी ठेवल्या. त्याला खूप छान वाटले.

बाबा म्हणाले, ‘काय बंकोबा, अचानकच आल्याबरोबर आवराआवर? गुड बॉय व्हायचं मनावर घेतलेलं दिसतंय.’

बंकू म्हणाला, ‘बाबा, मॉल मध्ये त्या मुलीला फुगा दिलं ना तेव्हा मला खूप छान वाटले. मी मोठा झाल्यासारखं वाटलं. म्हणजे जेव्हा मोठे कुणी मला काही देतात तेव्हा त्या

वस्तूची, त्या गिफ्टची मी काळजी घ्यावी, नीट वापरावे  असेच त्यांना वाटत असेल ना? आणि समजा मी त्या वस्तूंची तोडफोड केली तर त्यांना वाईट वाटेल ना? त्या मुलीने माझ्या फुग्याची काळजी घावी असे मला वाटते आहे.. तसच. म्हणून मी सगळया वस्तू नीट ठेवल्या.'

खरच माझं बाळ मोठं झालंय ग!' आईने त्याला जवळ घेतले.

बाबा म्हणाले, 'बाळ असं मोठ्यांसारख वागायला, बोलायला लागलं की आपण लहान झाल्यासारखं वाटतं नाही कां?' आणि बाबांनी आईकडे बघून डोळे मिचकावले. आणि मग मोठ्‌ठ्या झालेल्या बंकुने छोट्या छोट्या आई बाबांची पापी घेतली.

---***---

# कम्युनिटी हेल्पर

बंकू नेहमी गोष्ट सांगण्यासाठी हट्ट करायचा नाहीतर सतत काही ना काही तरी प्रश्न विचारायचा. हे काय? ते काय? हे कशासाठी? ते कशासाठी? ह्याच काय करायचं? त्याने असे काय केलं? त्याच्या डोक्यात केव्हा काय प्रश्न येईल ते सांगता येणार नाही. बाबा गोष्ट सांगा, आईच्या तर सतत मागे असायचा. मला गोष्ट सांग, आत्ताच्या आत्ता सांग. आणि मग आईने काही सांगितले की हसायचा.

सगळयांकडून गोष्टी ऐकून ऐकून आणि मनात येतील ते प्रश्न विचारून बंकूच्या छोटयाशा डोक्यात विचारांचा एवढा मोठा एनसायक्लोपिडिया तयार झाला होता.

सगळयांनी सांगितलेल्या गोष्टींमध्ये दोन गोष्टी अगदी कॉमन असायच्या. म्हणजे सगळेचजण गोष्ट सांगा म्हटलं की त्या दोन गोष्टी हमखास सांगायचेच. एक म्हणजे काऊ चिऊची आणि दुसरी गणपतीची. गणपतीने आईच्या भोवती प्रदक्षिणा घातल्या आणि पृथ्वी प्रदक्षिणा झाल्या असे डिक्लेअर केलं... खरच बुद्धीचा देव..

आजोबांना तर बहुधा फक्त या दोनच गोष्टी येत असाव्यात. आणि आजोबांची आणखी एक गंमत.. चिमणी कावळयाच्या गोष्टीतल्या कावळयाला, म्हणजे ज्याला खरं तर ‘क्रो’ म्हणायला हवं, त्याला काऊ म्हणतात आणि जी ‘काऊ’ असते, दुध देणारी तिला ‘गाय’ म्हणतात. आणि ज्याला ‘गाय’ म्हणायचं असतं म्हणजे एखाद्या माणसाला, त्याला ते ‘राव’ म्हणतात. त्यामुळे आजोबांकडून अशा गोष्टी ऐकायला त्याला खूप मज्जा यायची.

एकदा बंकू आजोबांसोबत स्टेशनवर गेला. आत्या येणार होती तिच्या छोट्या बाळाला घेवून. आत्याच्या बाळाला बोलता येत नव्हतं आणि चालताही येत नव्हतं. त्याला टोपी घालायचे. आणि दात नसल्यामुळे त्याला काही खाता येत नव्हतं म्हणून नुसतं दुध

द्यायचे. दात नसल्यामुळेच त्याला बोलता येत नसावं बहुधा... तर आता आत्या आणि तिचं गोड बाळ येणार होतं. त्यांनाच आणायला तो जाणार होता. बाळ आल्यावर तर मग मज्जाच मज्जा..

आजोबांनी दोन तीन रिक्षावाल्यांना विचारले की स्टेशनवर येणार का? तर ते काहीच न बोलता निघून गेले.. बंकूने पण एका रिक्षावाल्याला हात दाखवला तर त्याने रिक्षा पण थांबवला नाही.. बंकूला वाटले हे लोक बोलत नाहीत, थांबत नाहीत तर मग का चालवतात? आजोबांनी विचारले, 'काय बंकूराव बसने जायचं का?' बंकूला राव म्हटलं की एकदम मोठ्ठं झाल्यासारख वाटायचं. आणि त्याला रिक्षापेक्षा बसनेच जायला आवडायचं. तेवढ्यात बस आलीच.

बंकू आणि आजोबा बसमध्ये चढले. बसमध्ये बरीच गर्दी होती. आजोबांसाठी ज्या राखीव जागा होत्या त्यावर एक माणूस बसलेला होता. पण बंकूला आणि आजोबाना बघताच तो पटकन उठून उभा राहिला. बंकूही आजोबांसोबत त्या जागेवर बसला. त्यांच्या

समोरच आत्यासारखंच छोटं बाळ घेतलेली एक बाई उभी होती. तिने साडी नेसली होती. बंकूला ती बाई आणि तिचं बाळ खूपच आवडलं होतं. ती सारखं सारखं मागे वळून बघत होती. तिच्या हातात तिकिटासाठी पैसे होते पण कंडक्टरकाका मागच्या मागेच तिकीट देत होते आणि समोरच्या बाजूला येतच नव्हते. ती बाई म्हणत होती, 'पुढच्याच थांब्यावर उतरायचय मला. बाळाला घेवून मागे कशी जावू मी? तिकीट तर काढायला हवं.'

बंकू एकदम म्हणाला, 'आत्या.. नाही.. नाही.. काकी मी आणतो तुमच्यासाठी तिकीट.' त्याने तिच्या हातातून पैसे घेतले आणि तो गर्दीतून वाट काढत मागे गेला. तिथे कंडक्टरकाकाना खूप घाम आला होतं आणि त्यांनी त्यांचे दात जोराने एकमेकांवर दाबून धरले होते. त्यांना बरे वाटत नसावे असे त्यांच्याकडे बघून वाटत होते.

बंकू कंडक्टरकाकांजवळ गेला आणि म्हणाला , 'काका, एक तिकीट द्या लवकर, त्या काकीना पुढेच उतरायचे आहे आणि त्यांच्याजवळ छोटे बाळ आहे.' कंडक्टरने पटकन तिकीट आणि सुटे पैसे बंकुजवळ दिले. बंकू तसाच गर्दीतून पुढे आला. त्याने ते पैसे आणि तिकीट

काकींना दिले. बंकूने बाळाचा छोटासा हात हातात धरून हलवला. बाळही त्याच्याकडे बघून हसले. काकी आजोबाना म्हणाल्या, ‘तरतरीत आहे हो मुलगा..’ आणि बंकूकडे बघून म्हणाल्या ‘तुझ्यामुळे तिकीट भेटलं बरं का..? लहान असल्यामुळे तुला गर्दीतून पटकन जाता आले मागे..’ तेवढ्यात त्यांचा थांबा आला. बाळाला सांभाळत हळूच त्या खाली उतरल्या. बंकू हसला.

आजोबा म्हणाले, ‘काय बंकोबा काय झालं हसायला?’ बंकू म्हणाला, ‘आजोबा, त्या काकी म्हणाल्या, तिकीट भेटलं.. तिकीट कुठे भेटतं का..? तिकीट मिळत असतं. माणसे भेटत असतात, नाही का? वुई गेट द टिकेट एन वुई मीट द पीपल.. हो ना आजोबा..?’ आजोबा खिडकीतून बाहेर बघत होते आणि बंकू आजोबाना हलवून हलवून हाच प्रश्न विचारत होता.. आजोबाना बंकूची ही सवय माहित होती. ते बंकूकडे वळले आणि म्हणाले, ‘होय हो बंकोबा.. बोली भाषेत तीच तर गंमत असते.’

बंकू हसला. ‘बंकोबा..’... आजोबा लाडात आले की त्याला बंकोबा म्हणत.. बंकोबा म्हंटले की त्याला बोकोबा म्हटल्यासारखे वाटे.. दुध पिवून मिशा पुसणारा बोकोबा.. त्याने शर्टाच्या बाहीने तोंड पुसले आणि मांडीवर ताल धरला. ‘ताकी.. ओ.. ताकी’ च्या तालावर ‘काकी ..ओ.. काकी’.. असे तो मोठ्याने गायला लागला. आपण बसमध्ये आहोत हेही तो विसरला. आजूबाजूच्या सगळया ताई, काकी आणि काका हसायला लागले. काही क्षणापुरते का होईना, सर्वांच्या मनावरचा ताण दूर झाला होता.

त्या काकींचे तिकीट काढल्यामुळे बंकूला आता एकदम उत्साहच आला होता. आणि त्याचा आत्मविश्वासही वाढला होता. अरेच्च्या.. त्याला एकदम आठवले, आपलेही तिकीट काढायचे राहिले आहे की.. तो आजोबांबरोबर पुढच्या दारातून आत शिरला होतं आणि कंडक्टर काका तर तेव्हापासून मागेच होते. त्यांना शेवटच्या थांब्यावर उतरायचे होते आणि कंडक्टर पुढे येईल म्हणून आजोबा निवांत बसले होते.

पण बंकूला राहवले नाही. त्याने आजोबांकडून पैसे घेतले आणि तो पुन्हा मागे गेला. आता गर्दीही थोडी कमी झाली होती. तो कंडक्टरकाकांजवळ गेला आणि ऐटीत म्हणाला, ‘ एक सिनियर सिटीझन आणि एक हाफ , स्टेशन..’ त्याने कंडक्टर काकांकडे बघितले तर त्यांचा चेहरा तब्येत बरी नसल्यासारखा दिसत होता. त्यांनी बंकूने दिलेले पैसे घेतले आणि त्यांच्या जवळच्या हाफ मून सारख्या बॅग मध्ये ठेवले. त्यांच्या त्या पैशाच्या बॅग अर्धवर्तुळाकार पिशवीबद्दल बंकूला पहिल्यापासूनच आकर्षण होते. कंडक्टर काका तिकीट द्यायला लागले आणि एकदम त्यांची पैशाची हाफ मून बॅग आडवी झाली. सगळे सुटे पैसे घरंगळत जावू लागले. लोक एकदम घाबरले आणि बाजूला सरकले. अरे.. अरे.. असे म्हणत कंडक्टर काका खाली वाकले तर एक नोटांचे बंडल पण खाली पडले. बंकूने प्रसंगावधान राखले आणि एकदम ओरडला.  स्टेच्यू !!!  ...कुणीही हलायचं नाही.. कुणीही वाकायचं नाही..’ आणि त्याने पटकन ते नोटांचे बंडल कंडक्टर काकांच्या हातात दिले. भराभर वाकून, पटकन सीटच्या खाली जावून सुटे पैसे गोळा केले. आणि मोजून सगळे पैसे कंडक्टर काकांजवळ दिले.

ते म्हणाले ‘शाब्बास पोरा, अरे संकष्टीचा उपास आहे आणि रात्री ड्युटी होती, त्यामुळे सुधरेना बघ काही.. चक्कर आल्यासारखं वाटतंय..’ आजूबाजूचे सगळे लोक बंकूकडे कौतुकाने बघत होते.

बंकू म्हणाला, ‘काका तुम्ही लोकांसाठी काम करता. तुम्ही कम्युनिटी हेल्पर आहात. सर्वांना बसमध्ये घेता, तिकीट देता, मग त्या पैशांचा हिशेब करून ते सरकारकडे जमा करता. एवढे काम करायचे म्हणजे शक्ती पाहिजे ना..! उपास करत जावू नका.. एवढे मोठे पोट असणाऱ्या आणि ताटलीभर मोदक आणि लाडू खाणाऱ्या बाप्पालापण कुणी उपास केलेला आवडत नसेल. अच्छा, तर आता मला एक तिकीट द्या. एक सिनियर सिटीझन आणि एक हाफ, स्टेशन..’ कंडक्टर काकांनी तिकीट दिले आणि हसत हसत ते म्हणाले, ‘काय म्हणालास पोरा? ‘कम्युनिटी हेल्पर’ का..? बरं.. बरं ..हे शाळेत शिकवल असेल.

बंकू तिकीट घेवून आजोबांजवळ पुन्हा पुढच्या सीटवर आला. आजोबांनी बंकूला विचारले, ‘का बरे उशीर झाला आमच्या बंकोबाला..? बंकू गोड हसला आणि काय काय झालं ते सांगू लागला.

तेवढ्यात स्टेशन आले. आजोबा आणि बंकू खाली उतरले. बंकूने आजोबांचा हात धरला पण छोटा बंकू म्हणून नव्हे तर मोठा बंकू म्हणून.. थोडंस पुढे जाताच आत्या छोटयाशा बाळाला घेवून उभी असलेली दिसली. तिच्याजवळ समान होते, ते एका लाल कुर्ता घातलेल्या आणि पितळी बिल्ला लावलेल्या हमालाने खाली ठेवले. आजोबांनी पुढे होवून हमालाला पैसे दिले. त्याने जाता जाता आजोबाना सलाम साब म्हंटले. सलाम करत असतानाच त्याने बंकूकडे पण बघितले. त्याने ओरडून हमालाला म्हंटले ‘थंक यू, कम्युनिटी हेल्पर’. बंकू काय म्हणाला ते हमालाला कळले नाही तरी पण बंकू ‘थंक यू’ म्हणाला तेवढं मात्र कळल. तो बंकूकडे बघून हसला आणि निघून गेला.

आत्याचं बाळ मुठी चोखत होतं. त्याचे केस कुरळे होते आणि ते टोपीतून बाहेर आले होते. बंकू आत्याला म्हणाला , ‘आत्या, तुझ्या बाळाचे केस नूडल्स सारखे आहेत, तू खूप नूडल्स खातेस कां?’

आजोबा म्हणाले, ‘बंकूराव घरी गेल्यावर मारा गप्पा.’ आत्या म्हणाली, ‘बंकू, माझा पिटुकला किती मोठा झालंय बघ. कसा टुकूटुकू बघतोय सगळीकडे.’ बंकू म्हणाला, ‘आत्या मी घेवू बाळाला? तुझे हात दुखत असतील.’ आत्या म्हणाली, ‘ घरी गेल्यावर घे हं..’

‘आत्या, मी आज कम्युनिटी हेल्पर झालो. म्हणजे ते गणपतीच्या गोष्टीत नाही का, गणपती आईला प्रदक्षिणा घालतो आणि म्हणतो की आईला प्रदक्षिणा घालणे म्हणजे जगाचा फेरफटका केल्यासारखे आहे. तसेच मी जर कम्युनिटी हेल्परला हेल्प केली तर मी पण कम्युनिटी हेल्परच झालो नाही का? म्हणजे कम्युनिटीला हेल्प केल्यासारखच आहे, हो की नाही?’

बंकू काय बडबडत होतं ते आत्याला काही कळत नव्हते.

‘पण आत्या, कम्युनिटी म्हणजे काय ग?’ बंकूने विचारले. आजोबा हसले आणि म्हणाले, बंकोबा, अरे आता माहेरवाशिणीला प्रश्नांची सरबत्ती करणार का?’

‘माहेरवाशीण? म्हणजे आत्या माहेरवाशीण? पण माहेरवाशीण म्हणजे काय? आणि प्रश्नांचे सरबत म्हणजे काय?’ तो काहीतरी विचारणार तेवढ्यात आत्याने हसून त्याच्याकडे बघितले. आता पूर्ण माहेरवासात बंकूच्या असंख्य प्रश्नांना तिला सामोरे जायचे होते.

----***----



नीलम गिरीष संगवई (लग्नापुर्वीच्या नीलम नीळकंठ देशमुख) या मूळच्या नांदेडच्या. मंत्रालयातील नोकरीच्या निमित्ताने त्या आता मुंबईकर झाल्या आहेत. त्यांच्या कथा यापुर्वी मिळून सार्‍याजणी, लोकपत्र, साहित्य लक्ष्मी , उद्याचा मराठवाडा आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत आणि वाचकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. आकाशवाणीच्या नांदेड केंद्रावरील युववाणी कार्यक्रमातून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले. बरोडा येथील अखिल भारतीय वाङ्मय परिषदेचा २००४ चा सर्वोत्कृष्ट कथालेखनाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. सध्या त्या ई साहित्य प्रतिष्ठानसाठी बालसाहित्य लेखन करीत आहेत.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानने लहान मुलांसाठी ई साहित्य बनवण्याचा आपला कार्यक्रम धडाक्याने सुरू ठेवला आहे. लहान मुलं हीच भविष्य. मराठी भाषा कितपत वाढणार व वापरली जाणार ते आताची लहान मुलंच ठरवणार नाही का? आणि भाषांचं भविष्य ठरणार आहे मोबाईल आणि कॉम्प्युटर, आयपॅड, टॅब्लेट वरून. आताच्या मुलांना इंटरनेट आणि ई बुक्स हेच आयुष्य असणार आहे. त्यांना मराठीत ई बुक्स वाचण्याची सवय आतापासूनच लावायला हवी. पण त्यांना ती आवडतील का? वाचतील का ती? तर हो ! कशावरून? तर अनुभवावरून सांगतो.

या वर्षी सासवड येथे साहित्य संमेलन झाले. त्यात ई साहित्य प्रतिष्ठानने ई पुस्तकांची माहिती देणारा स्टॉल ठेवला होता. त्यावर मोबाईल टु मोबाईल ब्ल्यु टुथ ने

पुस्तकं ट्रांस्फ़र केली. आणि लहान मुलांसाठी एक साठ पुस्तकांची सुंदर सिडी सुद्धा ठेवली होती. तीन दिवसांचा कार्यक्रम होता. म्हणून भरपुर साठा नेला. पण लहान मुलांच्या ई पुस्तकांची सीडी पहिल्याच दिवशी आउट ऑफ़ स्टॉक झाली. नंतरचे दिवस या स्टॉलवर हिरमुसल्या चेहऱ्याने शेकडो मुले भेट देऊन गेली. शेकडो नव्हे नव्हे हजारो. ज्यांना मराठी भाषेच्या भवितव्याची चिंता वगैरे असेल त्यांनी कृपया पुन्हा पुन्हा वाचावे. लहान मुलांना ई पुस्तकं अतिशय आवडतात.

म्हणून ई साहित्यने खास बालविभाग सुरू केला आणि नाशिकच्या अनघा हिरेंच्या सबल मार्गदर्शनाखाली तो उत्तम चालला आहे.

तुमच्या मुलांना हे दाखवा. वाढू द्यात. मुलांना आणि ई साहित्याला.

आपले नम्र
टीम ई साहित्य

